MHJN020021832018

भूसंपादन निर्देशन अर्ज क्र.१८९/२०१८
शामराव काळे व इतर वि. शासन व इतर
CNRMHJN020021832018

**<u>निशाणी क्रमांक १७ वरील आदेश</u>**

सदरचा अर्ज मयत अर्जदार क्र.४ चे वारसांतर्फे मयत अर्जदार क्र.४ चे वारस रेकॉर्डवर घेणेकामी सादर केला आहे.

२) अर्जातील कथने थोडक्यात पुढील प्रमाणे –

भूसंपादन निर्देशन अर्जातील मुळ अर्जदार क्र.४ दिनांक १३/०४/२००६ रोजी मयत झाला आहे. त्याचे वारसांना भूसंपादन निर्देशन अर्जात समाविष्ठ करणे आवश्यक व गरजेचे आहे. त्यानुसार अर्जात मयत अर्जदाराची पत्नी, मुले व मुली यांना दुरुस्तीद्वारे रेकॉर्डवर घेणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यासाठी मयत अर्जदार क्र.४ चे अर्जातील नमूद वारस भूसंपादन अर्जाचे रेकॉर्डवर दुरुस्तीद्वारे घेण्याची मागणी मयत अर्जदार क्र.४ चे वारसांतर्फे प्रतिज्ञापुर्वक केली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३) सामेनवाल क्र.१ तर्फे सदर अर्जास अर्जावरच आपले म्हणणे दिले आहे. अर्जातील सर्व विरोधी कथने सामनेवाल क्र.४ ने नाकारली आहे. अर्जास योग्य कारण

नमूद नाही. त्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा.

४) मयत अर्जदार क्र.४ चे वारस व सामनेवाला क्र.१ तर्फे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) भूसंपादन अर्जातील मुळ अर्जदार क्र.४ मयत झाल्यानंतर सदरचा अर्ज त्याचे वारसांतर्फे अर्जातील नमूद वारस दुरुस्तीद्वारे अभिलेखावर घेणेकामी दिला आहे. मुळ अर्जदार क्र.४ मयत झाल्यानंतर त्याच्या वारसांना भूसंपादन अर्ज चालविण्याचा अधिकार आहे. अर्जातील नमूद वारसांनी ग्रामपंचायत केदारखेडा, तालुका भोकरदन यांचेकडील वारस प्रमाणपत्र निशाणी क्र.२२ वर दाखल केले आहे. तसेच, मुळ अर्जदार क्र.४ मयत असल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देखील निशाणी क्र.२१ वर दाखल आहे.

६) सामनेवाला क्र.४ तर्फे अर्जास दर्शविलेला विरोध तथ्यहिन असल्याचे दिसून येते. निशाणी क्र.२२ वरील वारस दाखल्याप्रमाणे मयत क्र.४ यास अर्जातील नमूद वारस असल्याचे निदर्शनास येते. सदरहू वारस भूसंपादन अर्जाचे अभिलेखावर दुरुस्तीद्वारे आणणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. तसे न झाल्यास मयत अर्जदार क्र.४ चे वारसांचे नुकसान होणार आहे. त्या करिता सदरचा अर्ज खर्चाशिवाय मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. या करिता सदरचा खर्चाशिवाय मंजूर करण्यात येत आहे. म्हणून

मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) अर्ज निशाणी क्र.१७ खर्चाशिवाय मंजूर करण्यात येत आहे.

२) परिणामतः मयत अर्जदार क्र.४ चे वारस अर्जात नमूद केल्याप्रमाणे भूसंपादन निर्देशन अर्जाच्या अभिलेखावर विहीत मुदतीत घेण्यात यावे व भूसंपादन निर्देशन अर्जाची दुरुस्त प्रत लगोलग दाखल करावी.

स्वाक्षरीत/–
(एन. एल. येवलेकर)
दिनांकः १९/१२/२०२३ दिवाणी न्यायाधीश व.स्तर
जालना

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे
न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय व.स्तर, जालना
दिनांक : १९/१२/२०२३

सही/–
एम. डी. आढे
लघुलेखक (ग्रेड–३)